वाचले :- १) क्र.माध्य/शि/०१/कावि/९१९/२०२४ दि.२८/११/२०२४

२) श्री.साळवे भास्कर कचर,सहाय्यक शिक्षक यांचा दि.०२/१२/२०२४ रोजीचा खुलासा.

३) माध्यमिक शिक्षण विभागाचा दि.    /०१/२०२५ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र.माध्य/शि/०१/कावि/१८/२०२५
दि - ७ /०१/२०२५

विषय – सक्त ताकीद देणेबाबत....

श्री.साळवे भास्कर कचर,सहाय्यक शिक्षक,मा.वि.थेरगाव

आदेश,

तुम्ही पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमिक शिक्षण विभागाच्या अंतर्गत माध्यमिक विद्यालय,थेरगाव या विद्यालयात सहाय्यक शिक्षक या जबाबदारीच्या पदावर कार्यरत आहात.तुम्हाला सहाय्यक शिक्षक पदाची जबाबदारी व कर्तव्य ज्ञात असणे तुम्हास आवश्यक आहे.

श्रीम.कु-हाडे रेखा पोपटराव (मुख्य लिपिक) यांनी दि.१९/११/२०२४ रोजीच्या अर्जान्वये तुमच्या बाबत तक्रार अर्ज या कार्यालयाकडे सादर करणेत आलेला आहे. श्रीम.कु-हाडे रेखा पोपटराव,मुख्य लिपिक यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे नमुद केले आहे की तुम्ही विद्यालयाच्या कार्यालयात येवून पेपर मागणीकरिता वाद घातला व त्यांच्या हातातून पेपर ओढून घेण्याचा प्रयत्न करताना तो फाटला गेला. तसेच कार्यालयामध्ये महिला कर्मचा-यांसोबत बोलताना सौम्यपणे बोलणे अपेक्षित असताना तुम्ही उध्दटपणे बोलता.सदर बाब कार्यालयीन कामकाजाच्या दृष्टीने अतिशय गंभीर स्वरूपाची आहे. तुम्हास याबाबत वाचले क्र.०१ अन्वये नोटीस देण्यात आलेली आहे.सदर नोटीसचा खुलासा वाचले क्र.०२ अन्वये तुम्ही विहित मुदतीत सादर केलेला आहे.

तरी, त्यामुळे सदर प्रकरणी तुम्हाला शैक्षणिक व प्रशासकीय बाबींच्या सुधारण्याच्या दृष्टीकोनातून एक वेळ संधी देवून तुमचा खुलासा मान्य करणेत येत आहे.तसेच तुम्हास या आदेशान्वये सक्त ताकीद देणेत येते की, तुम्ही यापुढे महिला कर्मचा-यांसोबत उध्दट बोलणे याप्रकारच्या पुन्हा तक्रारी प्राप्त झाल्यास महाराष्ट्र महानगरपालिका कलम-५६(२)“ड”अन्वये नियमाधिन प्रशासकीय कारवाई करण्यात येईल याची स्पष्ट नोंद घ्यावी.

(विजयकुमार थोरात)
सहाय्यक आयुक्त
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८.

प्रती,

श्री.साळवे भास्कर कचर,सहाय्यक शिक्षक

मा.वि.थेरगाव

प्रत,

१) मुख्याद्यापक मा.वि.थेरगाव

२/- सदर आदेश संबधीतांना बजाउन पुर्तता अहवाल इकडिल कार्यालयास सादर करणेत यावा.

२)मा.अतिरिक्त आयुक्त (१),

मा.माहितीसाठी सविनय सादर.